महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक :- कशिमं/२०२५-२६/पाच/३४ दिनांक :- ०८.०१.२०२६

वाचा :- १) परिपत्रक क्रमांक कशिमं/२०२५/पाच/६७४, दिनांक १८.०७.२०२५
२) परिपत्रक क्रमांक कशिमं/२०२५/पाच/१०५१, दिनांक १६.१०.२०२५

## परिपत्रक

[शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा - २०२५ ]
निकाल जाहीर करणेबाबत.

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकानुसार शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. सदर परीक्षेचा निकाल व गुणवत्ता यादी https://msbae.ac.in या संकेतस्थळावरील GRADE EXAM या टॅबमध्ये व https://dge.msbae.in / https://dge.msbae.in/Result/Search/Form या लिंकवर खालील प्रमाणे प्रसिध्द करण्यात येणार आहे. तसेच तात्पुरते प्रमाणपत्र व दुय्यम निकालपत्रक डाऊनलोड करणे /निकाल पडताळणी / ऑनलाईन नाव नोंदणी करताना विद्यार्थ्यांच्या नावामध्ये किरकोळ त्रुटी असल्यास नावातील त्रुटींची दुरुस्ती करिता ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा तपशील खालील प्रमाणे.

| क्र | तपशील | इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा | एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षा |
|---|---|---|---|
| १ | निकाल दिनांक | दि.०९.०१.२०२६ दुपारी १.०० वा. | |
| २ | प्रमाणपत्र | सहभागी शाळेंना लॉगइनवरुन ३ वेळा डाऊनलोड करता येईल. | |
| | | केंद्रांना ३ वेळा डाऊनलोड करता येईल. | |
| ३ | दुय्यम निकालत्रक | केंद्रांना ३ वेळा डाऊनलोड करता येईल. | |
| ४ | निकाल पडताळणी | ऑनलाईन पध्दतीने केंद्र प्रमुखांच्या लॉगइनवरुन अर्ज करता येईल. दिनांक १२.०१.२०२६ ते दिनांक ३१.०१.२०२६ पर्यंत (प्रत्येकी रु.१००/- प्रमाणे पडताळणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणे.) | |
| ५ | प्रमाणपत्र दुरुस्ती | ऑनलाईन नाव नोंदणी करताना विद्यार्थ्यांच्या सर्वसाधारण नोंदवहीतील नोंदी प्रमाणे / माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे अचूक नाव नोंदणी करताना विद्यार्थ्यांच्या नावामध्ये त्रुटी झाली असल्यास त्रुटींच्या दुरुस्तीकरिता ऑनलाईन पध्दतीने केंद्र प्रमुखांच्या लॉगइनवरुन दिनांक दिनांक १२.०१.२०२६ ते ३१.०१.२०२६ पर्यंतच प्रति विद्यार्थी (महाराष्ट्र) रु.२००/-व (महाराष्ट्राबाहेरील रु.४००/-) प्रमाणे दुरुस्ती शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरणा करता येईल. | |

आपल्या केंद्रावरील सहभागी शाळांचे तसेच खाजगी परीक्षार्थ्यांचे निकाल दिनांक ०९.०१.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता ऑनलाईन पध्दतीने प्रसिध्द करण्यात येणार असल्याचे तसेच प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने मिळणार असल्याबाबतची माहिती सहभागी शाळांना / सर्व संबंधितांना कळविण्यात यावे.

विहीत कालावधीमध्ये प्रमाणपत्र व दुय्यम निकालपत्रक डाऊनलोड करुन निकालपत्रानुसार प्रमाणपत्र बरोबर असल्याची खातरजमा केंद्र प्रमुखांनी करुन संबंधितास वितरीत करण्यात यावे. डाऊनलोड केलेली प्रमाणपत्रे जतन करुन ठेवावीत. व संबंधितांना मागणीनुसार उपलब्ध करुन देण्यात यावीत. डाऊन लोड केलेली प्रमाणपत्रे व दुय्यम निकालपत्रके जतन करुन ठेवण्याची जबाबदारी केंद्रप्रमुखाची राहील. केंद्र प्रमुखांनी प्रमाणपत्राची सॉफ्ट कॉपी जतन करुन ठेवावी व सहभागी शाळा तसेच विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी केंद्र प्रमुखांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

(विनोद दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.

प्रति,
केंद्र प्रमुख, शासकीय रेखाकला परीक्षा (सर्व)
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक सहभागी शाळेंच्या सर्व मुख्याध्यापक /प्राचार्य संबंधित विद्यार्थी व पालक यांच्या तातडीने निदर्शनास आणावे.

प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक, (माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
४) अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, सर्वे क्र.८३२-अ, फायनल प्लॉट क्रमांक १७८ व १७९, बालचित्रवाणी जळव, आधारकर रिसर्च इन्स्टिट्युट च्या मागे, बांभुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.
५) सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.
६) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हापरिषद (सर्व)
८) शिक्षणनिरीक्षक, बृहन्मुंबई दक्षिण/उत्तर/पश्चिम.
९) निवड नस्ती.